# पंचायत राज व्यवस्था आणि महिला सबलीकरण

प्रा. डॉ. रविंद्र दगडू वाघ

समाजशास्त्र विभाग प्रमुख

एस.एस.व्ही.पी.एस. आर्टस् व कॉमर्स कॉलेज, धुळे

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या दशकात आपल्या देशाची सामाजिक, आर्थिक, शौक्षणिक, सांस्कृतिक व राजकिय क्षेत्रात बरीच प्रगती झाली असली तरी 19 व्या शतकात समाजसुधारकांनी प्रथमच स्त्रियांना समाजात दिली जाणारी वागणूक व विषम सामाजिक दर्जाबाबत आवाज उठविला. राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमुर्ती महादेव रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापिलेल्या वा सुरु केलेल्या संस्था व सुधारणा विषयक कामे ह्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात पूरोगामी, प्रगतिशील, लोककल्याणकारी योजना, प्रकल्प कार्यक्रमांसाठी मानसिक, वैचारिक पाश्र्वभूमी तयार केली. स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांसाठी जाणीव-जागृतीचे प्रबोधनाचे प्रयत्न झाले. समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी सर्व नागरीकांना सामाजिक, आर्थिक, राजकिय न्याय देणारी, अविष्कार, धर्म व मतांचे स्वातंत्र्य देणारी 'राज्यघटना' स्विकारण्यात आली.

राज्यघटनेचा आधार घेऊन स्त्री-पुरुष समानता आणण्याचा प्रयत्न झाला. भारतीय समाजात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी, नियोजित परिवर्तनासाठी पंचवार्षिक योजनांची निर्मिती करण्यात आली. 2 ऑक्टोबर 1952 रोजी सुरु झालेली 'समाजविकास योजना' आता देशाच्या सर्व ग्रामीण भागांपर्यंत पोहचली आहे. साक्षरता, प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण यांचे प्रमाण वाढले. वैद्यकिय सेवांचा प्रसार झाल्यामुळे अपेक्षित आयुर्मर्यादा ग्रामीण व शहरी भागात जवळपास 65 इतकी झाली. ह्या सर्व विकास प्रक्रियेत वर्षानुवर्षे दुर्लक्षित, उपेक्षित राहिलेल्या महिलांना प्रगतीची, उत्कर्षाची, सुधारणांची दारे खुली झाली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीने महाराष्ट्रात 1 मे 1962 पासून पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. तिची अंमलबजावणी झाली, त्यालाच लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया म्हणून संबोधले जाते. सत्ता विकेंद्रीकरण व राजकिय आरक्षण यामुळे समाजातील महिलांना राजकारणात सहभागी होण्याची चांगली संधी निर्माण झाली. वास्तविक पाहता प्राचीन वैदिक, मौर्य, गुप्त व मध्ययुगात पंचायत ग्रामीण न्याय-निवाडयासाठी प्रसिध्द होती. पंचायतीलाच मराठेशाहीच्या राजवटीत 'स्थानिक स्वराज्य संस्था' असे म्हटले गेले. तसेच अबूल फजलच्या आईन ऐ अकबरी या ग्रंथात पंचायत राजचा उल्लेख आढळतो.

**अभ्यासाचा उद्देश :**

1) महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्थेतील महिला आरक्षण धोरणाचा अभ्यास करणे.

2) 73 व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांच्या अधिकारांचे विवेचन करणे.

3) महिला आरक्षण धोरणाचा ग्रामीण भागातील महिला राजकीय नेतृत्वावर पडलेला प्रभाव अभ्यासणे. अथवा पंचायत राज्यातील महिलांच्या राजकिय सहभागाचा अभ्यास करणे.

4) पंचायत राज्यात महिलांमुळे झालेल्या ग्रामीण विकासाचा अभ्यास करणे.

ग्रामीण विकासासाठी पंचायतीची भूमिका महत्वपूर्ण ठरते. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार सुचविलेल्या त्रिस्तरीय रचनेला म्हणजेच गावपातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद अशी पंचायतराज पध्दती आहे. या त्रिस्तरीय रचनेला पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी पंचायत राज्य असे संबोधिले. भारतीय राज्यघटनेनुसार पंचायत याचा अर्थ, ग्रामीण क्षेत्रासाठी प्रत्येक राज्यामध्ये ग्रामपातळीवर ग्रामपंचायत, मधल्या पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद नावाची पंचायती गठीत करण्यात आलेली 'स्वराज्य संस्था' असा आहे. अशा पंचायती महाराष्ट्रात 1 मे 1962 रोजी स्थापन झाल्या. भारतीय राज्यघटनेने कलम 14 नुसार स्त्री-पुरुष समानता मानली आहे. त्यामुळे स्त्रीयांना मतदानाचा आणि निवडणूका लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क व

अधिकार दिले यात राजकिय हक्क ही आहे. परंतू हे हक्क वापरण्यासाठीची परिस्थिती मात्र अनुकुल नाही. आर्थिक विषमता, स्त्री-पुरुष भेद, पुरुषी वर्चस्व, कौटुंबिक जबाबदारीमुळे स्त्रियांना हे हक्क बजावणे शक्य होत नाही. ही वस्तुस्थिती स्त्रियांना राजकारणापासून दूर ठेवते. याचा सारासार विचार करुन 1992 मध्ये भारत सरकारने 73 वी घटना दुरुस्ती करुन 'स्थानिक स्वराज्य संस्थेत' महिलांना 33% आरक्षण देऊन महिलांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. 20 एप्रिल 1993 रोजी राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना 33% आरक्षण विधयेक लागु झाले तेव्हापासून संपूर्ण देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नव्या युगास प्रारंभ झाला. 1992 साली झालेली 73 वी घटना दुरुस्ती राजकिय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढावा या हेतूने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले. स्त्री प्रश्नांना राजकीय चौकटीत मान्यता देणारे हे महत्वपूर्ण पाऊल होय. स्त्रीयांचे प्रश्न व दृष्टीकोन यांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळावे हा यामागचा हेतू होता. 73 वी घटना दुरुस्ती करुन देशातील सर्व पंचायत राज संस्थांमध्ये स्त्रियांसाठी 33% आरक्षण/राखीव जागा ठेवण्यात आल्या. या विधेयकामुळे राजकीय सहभागाच्या कधीही न थांबणाज्या एका प्रक्रियेला सुरुवात झाली. या विधेयकाने देशभरातील दहा लाखाच्यावर स्त्रियांना पंचायत राज व्यवस्थेमध्ये आणले. त्यांचा राजकीय सहभाग वाढला. स्त्रियांप्रमाणेच मागासवर्गीय जातींना देखील 73 व्या घटना दुरुस्तीमुळे आरक्षण मिळाले आहे. त्यात 33% मागासवर्गीय जातीच्या स्त्रीयांना आरक्षण आहे. केवळ सामान्य प्रतिनिधीत्वच नाही तर सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती अशी पदे भुषविण्याची देखील महिला प्रतिनिधींना संधी मिळाली. त्यामुळे गावाचा विकास, पाणी, वीज, स्वच्छता, रस्ते, दारुबंदीसारखे महत्वाचे प्रश्न महिलांनी पुढे आणले. आरक्षणाच्या माध्यमातून पंचायत राजमध्ये महिलांना आरक्षण देऊन त्यांना प्रतिनिधीत्वाची संधी दिली जावू लागली. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या पंचायतराज व्यवस्थेत महिला राजकीय नेतृत्व उदयास येऊ लागले. व महिला राजकीयदृष्टया सशक्त बनल्या.

महाराष्ट्रातील महिलांचा पंचायतराज व्यवस्थेतील सहभाग पुढीलप्रमाणे तक्त्यावरुन लक्षात येईल -

| अ. क्र. | स्तर | एकूण जागा | पुरुष | महिला | महिलांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | ग्रामपंचायत सदस्य | 223857 | 147907 | 75950 | 33.93% |
| 2. | सरपंच | 27983 | 18596 | 9297 | 33.33% |
| 3. | पंचायत समिती सदस्य | 3922 | 2250 | 1372 | 34.98% |
| 4. | पंचायत समिती सभापती | 351 | 202 | 149 | 42.45% |
| 5. | जिल्हा परिषद सदस्य | 1961 | 1286 | 675 | 34.42% |
| 6. | जिल्हा परिषद अध्यक्ष | 33 | 17 | 16 | 48.48% |

73 घटना दुरुस्ती विधेयकामुळे कायद्याने पंचायत राजव्यवस्थेला घटनात्मक स्थान प्राप्त झाले. राज्यघटनेच्या कलम 243(अ) ते कलम 243(ओ) यामध्ये पंचायतराज संस्था व महिला आरक्षणाबाबत तरतुदी केलेल्या आहेत. भारतीय राज्यघटना कलम 243 (घ) मध्ये जागांचे आरक्षण स्पष्ट करण्यात आले आहे. त्यात अनुसुचित जाती-जमातीचे व महिला आरक्षणाबाबत तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पंचायतराजच्या प्रत्येक पातळीवर एक तृतीयांशपेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील. महाराष्ट्र पंचायतराजमध्ये देखील ही तरतुद आहे. तसेच अनुसूचित जाती-जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रात या अधिनियमांची अंमलबजावणी 24 एप्रिल 1993 रोजी करण्यात आली. त्यामुळे हा दिवस 'पंचायतराज दिन' म्हणून साजरा केला जातो. एप्रिल 2012 पासून महाराष्ट्र पंचायतराजमध्ये महिलांना एक द्वितीयांशपेक्षा कमी नसतील एवढी पदे राखीव ठेवण्याचा प्रभावी निर्णय झाला. तसेच घटनेच्या कलम 243(ब)4 मध्ये बदल करुन महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत 50% आरक्षण दिले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व वाढले. साहजिकच महिला राजकिय सबलीकरणाची प्रक्रिया जोर धरु लागली.

ज्या प्रक्रियेच्या आधारे राजकिय सहभागाची व कार्य करण्याची क्षमता व सामथ्र्य विकसीत करते. तसेच सत्तेच्या साधनांवर नियंत्रण राहते. राजकीय संस्थेच्या माध्यमातून निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे व राजकिय सामाजिक क्षेत्रात न्याय तत्वाच्या आधारे अभिव्यक्ती प्रस्थापित करुन लोकशाही तत्वांना बळकटी आणणे म्हणजे सबलीकरण होय. महिलांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे म्हणजे महिला सबलीकरण होय. महिलांना समान संधी देऊन सामाजिक, आर्थिक व राजकिय समता प्रदान करणे, महिलांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेचा मोठा घटक

आहे. महिलांची उपेक्षा व संधी वंचितता ही त्यांना समान दर्जा देण्यास असमर्थ ठरत आहे म्हणून महिलांना पुरुषांच्या तुलनेत समान स्तरावर आणणेसाठी सशक्तीकरणाची वा सबलीकरणाची गरज आहे. स्त्रियांना समान संधी, हक्क, सत्ता आणि हक्कांपासून वंचित न ठेवता त्यांचे सबलीकरण करणे व राजकीय इच्छाशक्ती व त्याला प्रत्यक्ष रुप देण्यासाठी ठोस कायदेशीर उपाय व तरतुदींना विशेष महत्व आहे. तसेच निर्णय प्रक्रियेत महिलांना समान संधी, सहभाग महत्वाचा ठरतो. सामाजिक, आर्थिक, राजकिय व शौक्षणिक अशा सर्वच पातळ्यांवर स्त्रीयांना विशेष संधी देणे आवश्यक ठरते. विशेषत: ही संधी राजकीय सबलीकरणाच्या वा आरक्षणाच्या माध्यमातून देता येऊ शकते.

## निष्कर्ष :

पंचायतराज व्यवस्थेच्या 73 व्या घटना दुरुस्तीमुळे महिलांचे राजकिय नेतृत्व वाढीस लागत आहे. राजकीय नेतृत्वातून महिला सक्षम बनत आहेत. किंबहुना महिला आरक्षणामुळे वंचित, दुर्लक्षित ग्रामीण महिला वर्गाला सामाजिक कार्य व गावाचा विकास करण्याची संधी मिळते. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. ग्रामीण समाजातील बहुसंख्य महिला राजकिय प्रवाहात आल्या असून निर्णयक्षता संधी वाढली. स्त्रीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन समाजाचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलला आहे. परिणामी ग्रामीण विकासाला देखील चालना मिळाली.

## सारांश :

समाजात महिलांच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने समानरित्या भाग घेतांना दिसतात. महिलांना आपला हक्क आणि कर्तव्याची जाणीव निर्माण झाली आहे. आधुनिक परिवर्तनाच्या काळात स्त्री आधुनिकतेचे प्रतिनिधीत्व करीत आहे. स्त्रीयांना सक्षम करण्यासाठी 73 व्या घटना दुरुस्तीने स्त्रीयांचे नेतृत्व पुढे आले. राजकिय क्षेत्रात तिला समान संधी प्राप्त झाली असली तरी उच्च शिक्षित तरुण मुलींमधून महिला नेतृत्व घडावे यासाठी महिला नेतृत्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वातंत्र्य दिले जावे व सर्व प्रकारचे सहाय्य व वित्तीय मदत करणे आवश्यक आहे. त्यामुळे राजकिय परिवर्तन घडून येईल.

राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास व पुरुषांच्या बरोबरीने झाल्यास राजकारणात बदल होईल. राजकारणाला नवी दृष्टी मिळेल. तसेच राजकारणात संस्थात्मक बदल घडून येतील. म्हणून राजकारणाची व समाजाची दिशा बदलण्यास महिलाचा राजकिय सहभाग वाढणे आवश्यक आहे. नव्या पंचायतराज कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. ग्रामीण भागातील दुर्गम आदिवासी भागातून स्त्रियांचे नेतृत्व पुढे यायला लागले आहे. आपापल्या परिसरात ग्रामविकासासाठी व जनविकासासाठी महिलांनी विशेष कामगिरी करुन दाखविली आहे.

## संदर्भ :

1. भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, प्रा. बिराजदार/घोडके, अंकुश पब्लिकेशन, नागपूर
2. पंचायत राज्य, डॉ. वा.भ. पाटील, विद्या प्रकाशन, नागपूर
3. भोगले शांताराम (1990) – भारतातील स्थानिक प्रशासन, विद्या प्रकाशन, नागपूर
4. वाईकर अनंत वासुदेव (1999) भारत सरकार आणि भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था (पंचायतीराज) निराली प्रकाशन, पुणे
5. भारतातील महिला विकासाची वाटचाल – ज.शं. आपटे, पुष्पा रोडे, डायमंड पब्लिकेशन, पुणे (ऑक्टो. 2008)
6. ग्रामीण विकास, सवलिया बिहारी वर्मा, आभ नारायण पाण्डेय, शिवकुमार जालोदा, आविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स राजस्थान (2004)
7. भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर